


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज


संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : १७१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.०१ फेब्रुवारी २०२५

## जिल्ह्यातील डॉक्टरांसाठी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा

## पारनेर तालुका मेडिकल असोसिएशनचा पुढाकार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, अहिल्यानगर :** पारनेर तालुका मेडिकल असोसिएशन तर्फे आज ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारीला अहिल्यानगर डॉक्टर्स प्रीमियर लीग या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. नगर शहरातील साईदीप क्रिकेट अकॅडमी,वाकोडी फाटा येथे हि स्पर्धा होणार आहे. डॉक्टर रोजच्या धकाधकीच्या जीवनात स्वतः साठी अजिबात वेळ देत नसतात. समाजासाठी, रुग्णांसाठी काम करत असताना त्यांचे स्वतः च्या शरीराच्या व मनाच्या तंदुरुस्तीकडे दुर्लक्ष होते. त्यासाठी पारनेर तालुका मेडिकल असोसिएशने पुढाकार घेत संपूर्ण जिल्ह्यातील डॉक्टरांसाठी नगर येथे प्रथमच क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी दिली. हि क्रिकेट स्पर्धा ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत खेळविण्यात येणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एन. एस. चव्हाण, लोकमतचे संपादक सुधीर लंके यांच्या हस्ते होणार आहे. डॉक्टर अमित करडे, डॉ. हेमंत देशपांडे, डॉ. सुनील जाधव, डॉ. हर्षवर्धन तनवर, डॉ. पी.बी. कर्डीले, डॉ. गोपाल बहुरुपी, डॉ. सतीश सोनवणे, डॉ. राहुल पंडित यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असणार आहे. स्पर्धेच्या समारोपप्रसंगी पद्मश्री पोपटराव पवार, जेष्ठ पत्रकार प्रकाश पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे हे उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेच्या निमित्ताने जिल्ह्यातील सर्व डॉक्टर्स हे एकमेकांबरोबर क्रिकेट खेळणार असून, त्यानिमित्ताने डॉक्टरांच्या व्यस्त जीवनातून वेळ मिळून एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होण्याची संधी डॉक्टरांना मिळणार आहे. क्रिकेट रसिकांनी या स्पर्धेला आवर्जून हजेरी लावावी,असे आवाहन डॉ भाऊसाहेब खिलारी यांनी केले आहे.

## शहरातील नागरिकांना अगोदर सुविधा द्या आणि मगच करांची वसुली करा

**अक्षराज : आश्रुबा कोठावळे**

**दि.३१, कळंब (धाराशिव) :** कळंब न.प. ने अगोदर मूलभूत सुविधा द्याव्यात आणि मगच करांची वसुली करावी, तसेच लावलेले दोन टक्के मासिक व्याज माफ करण्यात यावे, अशी मागणी मा. नगरसेवक सतीश टोणगे यांनी केली आहे.

गेल्या तीन ते चार महिन्यापासून बाजारपेठा थंड आहेत.व्यापारी वर्गाकडे ग्राहक नाही, तसेच न.प.कडून नागरिकांना मूलभूत सुविधाही मिळत नाहीत. शहरातील प्रत्येक भागात कचऱ्याचे ढिगारे आहेत. नाल्यांची साफसफाई होत नाही, घंट्या गाड्या फिरत नाहीत. धनेगाव धरणात मुबलक पाणी साठा असतानाही पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. पाणी विकत घेण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. अंधाराचे साम्राज्य आहे. व्यापाऱ्यांच्या दुकानापुढे गाड्यांची रांग असते, त्या मुळे ग्राहक येत नाही. पार्किंगची सोय करण्यात यावी अशी अनेक दिवसांपूर्वीची मागणी आहे. कसल्याही सुविधा उपलब्ध नसताना न. प.चे कर्मचारी मात्र रजाकारी पद्धतीने करांची वसुली करत आहेत .थकबाकी, चालू बाकी न भरल्यास नोटीस देऊन त्यावर शहरात बोर्ड लावून बदनामी करण्याची भाषा बोलत आहेत, कर भरा नाहीतर बदनामीला सामोरे जा अशी पद्धत अवलंबली जात आहे. मुख्याधिकारी यांनी शहरातील नागरिकांना अगोदर मूलभूत सुविधा द्याव्यात आणि मगच करांची वसुली करावी अशी मागणी मा. नगरसेवक सतीश टोणगे यांनी करून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

## मुदखेड मधील कामांचे लेखापरीक्षण करण्याची मागणी

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.३१, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरात नगरपरिषद अंतर्गत चालू असलेल्या १७ विविध विकास कामांच्या निविदात अनागोंदी झाली असून आता त्याच कामांची त्रस्त तांत्रिक लेखापरीक्षण करण्याची मागणी काँग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे. मुदखेड शहराच्या विविध विकास कामांसाठी महाराष्ट्र नगरोत्थान अभियान जिल्हा स्तर याअंतर्गत 'तीन' आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत 'चौदा' अशा एकूण 'सतरा' कामांचे कार्यारंभ आदेश मुदखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी आदेशित केले होते. या सर्व निविदा घाईघाईने काढल्या असून अनेक गुत्तेदारांना दूर ठेवून मर्जीतील गुत्तेदारांना कामे दिल्याची थेट तक्रार काँग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे यांनी जिल्हाधिकारी तथा मुख्यमंत्री कार्यालयात करूनही निविदा संदर्भात नव्याने विचार करण्यात आला नाही. आता त्याच निविदांची सर्वच कामे शहरात चालू असून सर्व कामे मर्जीतील तीन कन्स्ट्रक्शन कंपन्यांना देण्यात आल्याचा आरोप लेखी निवेदनात केला आहे. त्यामुळे ई- निविदा प्रक्रिया घाईघाईने राबविण्यात आली इतर कन्स्ट्रक्शन कंपन्यांवर अन्याय झाला आहे. या संदर्भात स्वर्गीय खा. वसंतराव चव्हाण यांनीही फेर निविदा काढाव्यात असे पत्र जिल्हाधिकारी यांना दिले होते. परंतु त्यावर कुठलीही कार्यवाही झाली नाही. आगामी नगरपालिका निवडणूका डोळ्यासमोर ठेवून निवडणूक खर्च काढण्यासाठी मर्जीतील तीनच कन्स्ट्रक्शन कंपन्यांना निविदा बहाल करण्यात आल्याने कामे निकृष्ट दर्जाची चालू असून संबंधित कामांची नांदेड येथील एस जी जी एस संस्थे द्वारे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करण्याची मागणी काँग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे व सहकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. त्यामुळे यावर आता जिल्हाधिकारी कोणता निर्णय घेणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**मुदखेड शहरातील संबंधित १७ कामाच्या निविदा घाईघाईने मर्जीतील लोकांना देण्यात आल्या आहेत. या सर्व कामाची एस जी जी एस, नांदेड त्रयस्थ संस्थेकडून लेखापरीक्षण करण्यात यावे.**

**-कैलास गोडसे (शहराध्यक्ष,काँग्रेस मुदखेड)**

# अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या पत्नीला डॉक्टर पतीने संपवले

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, बुलडाणा :** मागील अकरा दिवसापूर्वी मोताळा तालुक्यातील दाभाडी दरोड्याच्या तपासाचा धक्कादायक निष्कर्ष निघालाय! हा दरोडा बायकोच्या विश्वासावरील दरोडा, नातेसंबधावरील दरोडा निघाला आहे. अनैतिक संबंधापायी डॉक्टर असलेल्या नराधम पतीने अगोदर पत्नीची हत्या केली, नंतर पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी घरात दरोड्याचा 'देखावा' तयार केला आणि स्वतःही गुंगीच्या गोळ्या घेत जखमी झाल्याचं सोंग वठविले. मात्र गुन्हेगार अट्टल असला तरी काहीनाकाही चुका करतो, मग या कथित दरोड्यातील आरोपी तर साधा पशु वैदकीय चिकित्सक, तो खाकीची काय फसवणूक करणार? चाणाक्ष आणि अनुभवी पोलिसांनी ही बाब ओळखली.



यापूर्वी डॉक्टरच्या मोबाईलमधील नको ते क्लीपिंग, व्हिडीओमधून सर्व प्रकार उघडकीस आला होता. काल बुधवारी रात्री उशिरा बोराखेडी पोलिसांनी आरोपी डॉ. गजानन टेकाडे (४५) याला ठाण्यात आणले. त्याला पोलिसी हिसका दाखविताच डॉक्टर पोपटासारखा बोलायला लागला. गजानन याने आपणच बायको (माधुरी टेकाडे) हिची अगोदर भरपूर झोपेच्या गोळ्या औषधीतून पाजून नंतर तिची उशीने नाक तोंड दाबून हत्या केल्याचे या पांढरपेक्षा आरोपीने कबूल केले. पत्नीच्या जवळच्या नातेवाईक असलेल्या युवतीसोबत अनेक वर्षांपासून असलेल्या अनैतिक संबंधातून आपण हे कृत्य केल्याचे टेकाडे याने सांगितले. यानंतर त्याने बोराखेडी पोलिसांना आपण केलेल्या खऱ्याखुऱ्या हत्येची आणि बनावट दरोड्याची हकीकत तपशीलवार पणे सांगितली. प्रकरणी आरोपी विरुद्ध हत्या करण्याच्या कारणसह विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे मोताळा तालुक्यात नव्याने खळबळ उडाली. बोराखेडी पोलिसांनी आरोपी डॉक्टर गजानन टेकाडे याला अटक केली आहे.

**कानून के हाथ !**

दाभाडी प्रकरण म्हणजे दरोडा असल्याचा बनाव करण्याचा आरोपी डॉक्टरने आटोकाट प्रयत्न केला. एवढेच काय जळगाव खान्देश येथे उपचार घेताना शुद्धीवर आल्यावरसुद्धा त्याने पोलिसांना जबाब देण्यास टाळाटाळ केली. मात्र आरोपीच्या नकारमागील कारण, बोराखेडी पोलिसांनी अचूक हेरले. जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चमूने हा दरोडा नव्हे तर 'अगदी वेगळा प्रकार आहे' हे ओळखले. यामुळे दरोड्याच्या संथ तपासावरून होणाऱ्या टीकेकडेदेखील दुर्लक्ष केले. तसेच शांत चित्ताने आणि संयम ठेवत तपास पूर्ण केला. यापरिणामी 'कानून के हाथ बहुत लंबे होते है' हे नव्याने सिद्ध झाले आहे.

काल बुधवारी रुग्णालयातून सुट्टी होताच रात्री बोराखेडी पोलिसांनी डॉक्टरला ताब्यात घेत बोरखेडी पोलीस ठाण्यात आणले. त्याला 'बाजीराव दाखविताच' टेकाडे याने भडाभडा आपल्या पापाचा घडा वाचला. २९ जानेवारीला डॉ. गजानन टेकाडे याचे घरात दरोडा पडल्याचे वरकरणी दिसून आले. मात्र ते सुनियोजित हत्याकांड असल्याचे सिद्ध झाले.

# महाराष्ट्राचे दोन्ही खो-खो संघ जेतेपदापासून एक पाऊल दूर!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, हलद्वानी :** गतविजेत्या महाराष्ट्राच्या महिला व पुरुष या दोन्ही खो खो संघांनी ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत अपेक्षेप्रमाणे अंतिम फेरीत धडक दिली. जेतेपदापासुन एक पाऊल दूर असलेल्या महाराष्ट्राच्या मुली अंतिम लढतीत ओडिशा संघाशी भिडतील, महाराष्ट्राच्या महिलांनी उपांत्य लढतीत दिल्लीचा ८ गुण आणि एक डावाने (२४-१६) धुव्वा उडविला.



नाणेफेक जिंकून प्रथम संरक्षण घेतलेल्या दिल्लीचा महाराष्ट्राच्या आक्रमणापुढे निभाव लागला नाही. महाराष्ट्राकडून प्रियंका इंगळे व अश्विनी शिंदे यांनी प्रत्येकी २ मिनिटे ४० सेकंद वेळ पळती करत जबरदस्त संरक्षण केले. प्रियंकाने ६ गुणही मिळविले. याचबरोबर कर्णधार संपदा मोरे (२ मिनिटे ३० सेकंद), संध्या सूर्वसे (२ मिनिटे) व गौरी शिंदे (२ मिनिटे) यांनीही संरक्षणात चोख भूमिका बजावली. दिल्लीकडून लक्ष्मी ओझा (१ मिनिट ४० सेकंद) व नंदिता प्रेमी (१ मिनिट २५ सेकंद) यांनी महाराष्ट्राच्या बलाढ्य आक्रमणाला काही वेळ प्रतिकार करून वाहवाह मिळविली.

पुरुष गटात महाराष्ट्राने प. बंगालची १० गुण व ७ मिनिटे राखून दाणादाण उडवली. महाराष्ट्राने बंगालवर फॉलोऑनही लादला होता. मात्र, त्यांना दुसऱ्या डावात आक्रमण करावे लागल्याने डावाने विजय मिळविता आला नाही. शुभम थोरात (१ मिनिट ४० सेकंद, २ मिनिटे पळती व ६ गुण) व सुयश गरगटे (२ मिनिटे, ५० सेकंद पळती व ६ गुण) यांनी अष्टपैलू खेळ केला. राहुल मंडल व सौरभ आढावकर यांनीही उत्कृष्ट कामगिरी करीत विजयात वाटा उचलला.

# महाराष्ट्राच्या नेमबाजांचा अचूक निशाणा! पार्थ मानेला पदार्पणातच सुवर्ण

## रुद्रांक्ष पाटीलला रौप्य तर किरण जाधवला कांस्य

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, डेहराडून :** मराठमोळ्या नेमबाजांनी सुवर्णासह रौप्य व कांस्य पदकाच्या कमाई करीत ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील त्रिशूल शूटिंग रेजवर महाराष्ट्राची पताका अभिमानाने फडकवली. शेवटपर्यंत रंगतदार झालेल्या १० मीटर एअर रायफल्स स्पर्धेत महाराष्ट्राच्या पार्थ माने या युवा खेळाडूने सोनेरी वेध घेतला, तर जागतिक सुवर्णपदक विजेता रुद्रांक्ष पाटील याने रुपेरी यश संपादन केले. सेनादलाचे प्रतिनिधित्व करणारा सातारा जिल्ह्यातील खेळाडू किरण जाधव याला कांस्यपदक मिळाले.



एअर रायफल्स स्पर्धेत अखेरच्या क्षणापर्यंत चुरस पहावयास मिळाली. १७ वर्षीय खेळाडू पाथने २५२.६ गुण, रुद्रांक्ष याने २५२.१ गुण, तर किरणने २३०.७ गुणांची नोंद करीत महाराष्ट्राला तिन्ही पदके जिंकून देण्याचा भीमपराक्रम केला. एका फेरीचा अपवाद वगळता पार्थने सुरुवातीपासून शेवटपर्यंत आघाडी टिकवत सुवर्ण यश संपादन केले. रुद्राक्ष हा मधल्या टप्प्यात सहाव्या स्थानावर होता. मात्र शेवटच्या चार टप्प्यांमध्ये त्याने एकाग्रता दाखवीत अतिशय अचूक नेम साधले आणि जोरदार मुसंडी मारत दुसर्या क्रमांकावर झेप घेतली. अर्थात त्याला पार्थ याची आघाडी तोडता आली नाही. पार्थ हा मूळचा सोलापूरचा खेळाडू असून गेले चार वर्षे तो सुमा शिरूर यांच्या पनवेल येथील अकादमीमध्ये प्रशिक्षण घेत आहे. त्याने कनिष्ठ गटाच्या जागतिक स्पर्धेत सोनेरी वेध घेतला होता तसेच २०२३ मध्ये त्याने सांघिक विभागात भारतात सुवर्णपदक मिळवून दिले होते. तो पनवेल येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेत बारावी शास्त्र शाखेत शिकत आहे.

**सोनेरी यशाची खात्री होती : पार्थ**

अंतिम फेरीत स्थान मिळवल्यानंतर मी फक्त सुवर्णपदक जिंकण्याचाच विचार केला होता त्या दृष्टीनेच सुरुवातीपासूनच मी अचूक नेम कसा साधला जाईल याचे नियोजन केले होते सुदैवाने माझ्या नियोजनानुसारच घडत गेले. या स्पर्धेत प्रथमच भाग घेताना सुवर्णपदक मिळवता आले याचा आनंद मला खूप झाला आहे असे पार्थ याने सांगितले.

जागतिक स्पर्धांसाठी होणार्या राष्ट्रीय चाचणी स्पर्धांमध्ये भाग घेत भारतीय संघात स्थान मिळवण्याचे माझे ध्येय आहे आणि अर्थातच ऑलिंपिक मध्ये प्रतिनिधित्व करणे हे माझे स्वप्न आहे ते मी साकार करू शकेन अशी मला आशा आहे असेही पार्थ याने सांगितले

मुंबई येथे स्नेहल कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेणार्या रुद्राक्ष याने जागतिक स्पर्धेत विजेतेपद मिळवीत गतवेळी ऑलिंपिक कोटा मिळविला होता. त्याने आजपर्यंत आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर भरघोस पदके जिंकली आहेत. राज्य शासनातर्फे गतवर्षी त्याला शिवछत्रपती पुरस्काराने ही सन्मानित करण्यात आले आहे. मधल्या टप्प्यात सहाव्या क्रमांकावर माझ्यावर थोडेसे दडपण होते तरीही मला पदकाची खात्री होती त्यामुळेच मी शेवटपर्यंत संयम व चिकाटी ठेवीत नेम साधले त्यामुळेच मला रुपेरी कामगिरी करता आली, महाराष्ट्राच्याच पार्थ याला सुवर्णपदक मिळाल्यामुळे मला खूपच आनंद झाला आहे असे रुद्रांक्ष याने सांगितले.

किरण जाधव हा सातारा जिल्ह्यातील भाटणवाडी या गावचा खेळाडू असून त्याने सन २०१५ मध्ये सुमा शिरूर यांच्या मार्गदर्शनाखाली नेमबाजीचा सराव सुरू केला. या खेळातील त्याची कामगिरी बघून सेनादलात त्याची निवड झाली. त्याने आतापर्यंत जागतिक स्तरावरील स्पर्धांमध्ये तीन सुवर्णपदके जिंकली आहेत तर राष्ट्रीय स्पर्धांमध्ये त्याला दोन सुवर्णपदके मिळाली होती.

# संपादकीय



## शेतकऱ्याच्या अनुभवांचे बोल

वामान बदल, ग्लोबल वॉर्मिंग याची चर्चा दहा-पंधरा वर्षांपूर्वी सुरू झाली. यामुळे तापमानवाढ होईल, हिमनद्या वितळतील, समुद्राची पातळी वाढेल, पाऊस अनियमित होईल, चक्रीवादळासारख्या आपत्ती वाढतील, तर दुसऱ्या बाजूला दुष्काळ, अतिवृष्टी हे तर निसर्गचक्रानुसार हजारो वर्षांपासूनच होत असल्याने त्याला कशाला घाबरायचे असा एक मतप्रवाह होता आणि आहेसुद्धा. हे सर्व खरे असले तरी त्या बदलाची तीव्रता आणि वारंवारिता ही चिंता करण्यासारखी बाब आहे. मागील पाच-सात वर्षांपासून हवामान बदलाची समस्या (तापमान वाढ, मोठा पाऊस, दुष्काळ, गारपीठ, पिकांवरील कीडरोग, इ.) सर्वांना जाणवत आहे. नोव्हेंबर-डिसेंबरातली एक बातमी अनेकांना आठवत असेल – शेवग्याच्या एका शेंगेची किंमत ३० रुपये झाल्याची ती बातमी. यामागचे कारण हवामान बदल हेच! कोणत्याही वनस्पतीच्या वाढीच्या दोन मुख्य अवस्था असतात. पहिली कायिक वाढ आणि दुसरी पुनरुत्पादक (फुले, फळे आणि बिया) वाढ. कायिक वाढ कशा पद्धतीने होते त्यावर त्या वनस्पतीला किती फळे लागणार हे ठरत असते. कायिक वाढ होण्यासाठी वातावरणीय घटक आणि शेतकरी अंगीकारत असणाऱ्या पद्धती म्हणजेच पाणी, खते देण्याच्या मात्रा, आंतरमशागत यांसारख्या कृती. तुलनेने कायिक वाढ ही वनस्पती शरीर क्रियाशास्त्राच्या दृष्टीने कमी गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. परंतु वनस्पतीला फुले लागणे आणि त्यांची फळधारणा होणे ही फार गुंतागुंतीची प्रक्रिया असते. कायिक वाढ कशा पद्धतीने झाली आहे यावर फलांची संख्या ठरते मात्र फळे किती लागणार हे ठरण्यासाठी वातावरणीय घटक फार महत्त्वाचे ठरत असतात. या वर्षी शेवगा उत्पादक शेतकऱ्यांशी चर्चा केली असता त्यांची तक्रार हमखास होती की शेवग्याच्या झाडांची वाढ खूप चांगली झाली होती. फलेही खूप लागली होती. परंतु शेंगा त्या प्रमाणात लागल्या नाहीत. या वर्षी पाऊस चांगला झाला परंतु तो सर्वच पिकांबाबत चांगला ठरला नाही. त्यात हे शेवगा पीकही येते. लागवडीपासून साधारण ८ ते १० महिन्यांमध्ये शेंगा काढणीला येतात. पाऊस चांगला झाला झाडाची वाढ चांगली झाली परंतु कळी अवस्थेमध्ये पुन्हा पाऊस आला, परिणामी शेवग्याची फूल गळ झाली. शेंगा कमी लागल्या. फुलामध्ये फळधारणा होऊन त्याचे शेंगामध्ये रूपांतर न झाल्यामुळे हे घडले. कायिक वाढ थांबणे आणि त्यानंतर फुले अन् फळे लागणे या दोन अवस्थांची सरमिसळ वातावरणातील बदलामुळे होते. असाच अनुभव डाळिंब तसेच लिंबांच्या बाबतही येत आहे.

सोलापूर जिल्हा हा डाळिंब बागांसाठी प्रसिद्ध. परंतु बदलत्या वातावरणाचा परिणाम म्हणजे डाळिंब पिकावर तेल्या मररोगाचा प्रादुर्भाव वाढला, परिणामी त्या पिकाखालील क्षेत्र कमी झाले. मागील वर्षी वातावरण बदलामुळे पेरूची फळे काळी पडली या वर्षी पेरू चांगला आला परंतु भाव मिळाला नाही. सीताफळ पिकाला किडीने ग्रासले त्यामुळे त्याचेही भाव पडले आहेत. ही दोन्ही पिके परवडत नाहीत म्हणून शेतकरी बागा काढून टाकत आहेत. याचा एक अर्थ असा की हवामान बदलाच्या रेट्यामुळे पीक पद्धतीमध्येही तीव्र बदल होत आहेत. असे बदल आणि अन्न-पोषण सुरक्षा असाही विचार झाला पाहिजे. वातावरण बदलामुळे अनेक पिकांवरील कीडरोगाचे अनुभव नवीनच असल्यामुळे त्याच्या निवारणासाठीच्या पद्धती अजून ठरलेल्या नाहीत. हतबल शेतकरी त्याला सुचेल ते उपाय करीत आहे. परिणामी उत्पादन खर्च वाढत आहे. या सर्व घडामोडींमागेही हवामान बदल हे एक मुख्य कारण आहेच.

# श्री गजाननाच्या जन्मामागील व्यापक दृष्टिकोन !

कोणतेही शुभकार्य म्हटले की सर्वप्रथम पूजन केले जाते ते श्री गणेशाचे. श्री गणेश हा अष्टदिशांचा स्वामी आहे त्यामुळे त्याच्या परवानगीशिवाय कोणीतीही देवता कार्याच्या ठिकाणी येऊ शकत नाही. श्री गणेशाने दिशा मोकळ्या कराव्यात तसेच शुभकार्यात कोणतेही विघ्न येऊ नये यासाठी सर्वप्रथम श्री गणेशाचे पूजन केले जाते. केवळ हिंदू धर्मातच नव्हे तर अनेक पंथांमध्ये कार्यारंभी श्री गणेशाचे पूजन केले जाते. लहानांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांनाच श्री गणेश प्रिय आहे. महाराष्ट्रात तर सर्वात मोठा उत्सव हा श्री गणेशाचाच असतो. भाद्रपद मासातील गणेश चतुर्थीच्या दिवशी श्री गणेशाची मातीची मूर्ती घरी आणून तिची घरामध्ये प्राणप्रतिष्ठा करतात. दीड, तीन, पाच, सात किंवा दहा दिवस बाप्पाची सकाळी आणि सायंकाळी पूजा-आरती करून बाप्पाला प्रतिदिन वेगवेगळ्या पक्वान्नांचा नैवेद्य दाखवला जातो. सप्तमीला श्री गणेशाची माता पार्वती म्हणजेच गौरीचे आगमन होते. अष्टमीला गौरीपूजन केल्यानंतर नवमीला गौरीसोबत श्री गणेशालाही निरोप दिला जातो. सर्वांचाच लाडका असलेल्या बाप्पाच्या या सणाला पौराणिक कथेचा आधार आहे. गेल्या काही वर्षांपासून माघ महिन्यातील विनायक चतुर्थीला म्हणजेच गणेश जयंतीच्या दिवशीही काही जण घरी श्रीगणेशाची मूर्ती घरी आणून तिचे पूजन करू लागले आहे. काही ठिकाणी तर माघ महिन्यातही गणेशोत्सव सार्वजनिकरित्या साजरे होऊ लागले आहेत. ही संख्या वर्षागणिक वाढत आहे. श्रीगणेश जयंतीच्या दिवशी श्री गणेश मूर्ती घरी आणण्यामागे कोणतीही कथा किंवा शास्त्र यांचा आधार नसला, तरी मनुष्य मुळातच उत्सवप्रिय प्राणी असल्याने त्याला उत्सव साजरे करण्यासाठी केवळ एखादे निमित्त पुरेसे असते. माघी गणेश जयंतीनिमित्त घरी बसवले जाणारे गणपती याचाच भाग आहे.

श्री गणेश लहरी ज्या दिवशी प्रथम पृथ्वीवर आल्या, म्हणजेच ज्या दिवशी श्री गणेशाचा जन्म झाला, तो दिवस होता माघ शुद्ध चतुर्थी. तेव्हापासून गणपतीचा आणि चतुर्थीचा संबंध जोडला गेला. माघ शुद्ध चतुर्थी ही 'श्री गणेश जयंती' म्हणून साजरी केली जाते. या तिथीचे वैशिष्ट्य म्हणजे, या तिथीला श्री गणेशाचे तत्त्व



हे नेहमीच्या तुलनेत १ हजार पटीने कार्यरत असते. श्रीगणेशाच्या जन्माची कथा सर्वांनाच ठाऊक आहे. माता पार्वतीने स्नानासाठी जाताना शरीराच्या मळापासून बाळ तयार केले आणि सिद्धीद्वारे त्यामध्ये प्राण टाकले. या बाळाच्या हाती तिने दंड दिला आणि आईचे स्नान होईपर्यंत कुणालाही आत सोडू नकोस असे बजावून ती स्नानासाठी गेली. जेव्हा भगवान शिव कैलासावर आले तेव्हा ते माता पार्वतीच्या कक्षात जाण्यासाठी निघाले. त्याच क्षणी गणेशाने त्यांना अडवले. शिवांनी त्यांना आपली ओळख सांगूनही मातेची आज्ञा कुणालाही आत न पाठवण्याची असल्याने त्याने शिवांना आत सोडले नाही. शिव आपल्या स्थानावर गेले आणि त्यांनी नंदी सह गणांना गणेशाची समजूत काढण्यासाठी गणेशाकडे पाठवले; मात्र गणेशाने या सर्वांनाच मार देऊन पिटाळले. गणेशाच्या या कृतीने क्रोधीत झालेल्या शिवांनी अखेर त्रिशूल सोडून गणेशाचे शीर धडावेगळे केले. ही बातमी माता पार्वतींना कळताच त्यांनी रौद्ररूप धारण केले. त्यांना शांत नाही केले तर पृथ्वीचा विनाश होंणार हे निश्चित होते. गणांसह देवादिकांनी त्यांची समजूत काढल्यावर त्या शांत झाल्या; मात्र श्री गणेशाला पुनर्जीवित करण्याची अट त्यांनी घातली. यानुसार शिवांनी इंद्रासह देवांना जंगलात उत्तर दिशेला पाठवले आणि सर्वप्रथम जो प्राणी दिसेल त्याचे शीर आणण्यास सांगितले. पुष्कळ शोध घेतल्यानंतर त्यांना एक हत्ती दृष्टीस पडतो.

हा हत्ती म्हणजे गजासुर होता ज्याने शिवाची प्रचंड भक्ती करून त्यांना प्रसन्न केले होते. शिव कायमस्वरूपी आपल्या सोबत राहावेत अशी त्याची इच्छा होती. श्री गणेशाची शीर हवे आहे कळले तेव्हा त्याने देवादिकांना आपले शीर घेण्याची विनंती केली. गजासुर हा महाज्ञानी होता. श्री गणेशाच्या माध्यमातून त्याला सदैव शिवांजवळ राहता येणार असल्याने तो आनंदी होता. गजासुरचे शीर गणेशाला लावण्यात आले. शिवांनी देहाला जिवंत गेले आणि गजाननाचा जन्म झाला. कोणत्याही कार्यात श्रीगणेशाचे सर्वप्रथम पूजन केले जाईल असा शिवांनी गणेशाला वर दिला.

पार्वतीने तयार केलेला गणेश महापराक्रमी होता. सामर्थ्याला म्हणजेच शक्तीला सात्त्विकतेची, म्हणजेच शिवाची जोड नसेल, तर सामर्थ्याचा अहंकार वाढतो. तो सर्वदा विनाशकारी असतो. त्याव्यतिरिक्त हा पुत्र आपली आज्ञा मानणारा असावा, असाही त्याच्या जन्माच्या वेळी पार्वतीचा एक स्वार्थी विचार असतो. स्वार्थी वृत्तीने केलेली कलाकृती सात्त्विकतेपासून दूर जाते. त्यामुळे मातेचे आज्ञापालन करतांना गणेश सारासार विवेकाच्या मर्यादा उल्लंघतो. करुणा, दया, क्षमा यांचे भान उरत नाही. रज-तम गुणांकडे झुकणारी ही शक्ती तमोगुणी अधिक होते. गणेशाच्या संदर्भातही असेच झाले होते. आदिशक्तीच्या मळापासून बनलेल्या गणेशाची शक्ती अफाट होती; परंतु बुद्धी मात्र मलिन, रज-तमोगुणी होती. वास्तविक हा पार्वतीनंदन विश्वाच्या कल्याणासाठी, ते मंगलमय करण्यासाठी अवतीर्ण झाला होता; परंतु 'अशी मलिन बुद्धी जगाचे कल्याण नव्हे, तर अकल्याणच करणार', हे त्रिकालज्ञानी शिवाने जाणले होते. आपल्या सामर्थ्याच्या अहंकाराने अन्याय करणार्‍या पुत्रामुळे जगाचे भवितव्य अंधकारमय होऊ नये, यासाठी त्याची मलिन बुद्धी जाणे आवश्यकच होते आणि ती घालवण्यासाठीच मलिन बुद्धी असलेले त्याचे शिर धडावेगळे करण्याचा निर्णय शिवांना घ्यावा लागतो. धन्य ते पिता, जे जगत्कल्याणासाठी पुत्राचे शिर धडावेगळे करण्याशी मागे पुढे पाहत नाहीत. **(आधार : सनातन डॉट ऑर्ग)**

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# विदर्भ वैभव संघ व इंजिनिअरिंग इंडिया क्लबतर्फे देशभक्ती गीतावर युवक, युवतींचा जल्लोष

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३१, नागपूर :** आजच्या आधूनिक समाजातील युवक, युवतींना देश श्रभक्ती बाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी ज्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरीता आपल्या प्राणांचे बलिदान देऊन स्वतंत्र मिळून दिले त्यांचे समरण राहवे म्हणून २६ जानेवारीला विदर्भ वैभव संघ व इंजिनिअरिंग इंडिया क्लबतर्फे नागपुरातील ट्रैफिक पार्क, धरमपेठ येथे सायंकाळी ५ वाजता देश भक्तीवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात नागपुरातील यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, श्री रामदेवबाबा विश्वविद्यालय, जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, प्रियदर्शिनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, कमिंस कॉलेज ऑफ इंजीनियरिंग फॉर विमेन, केडीके कॉलेज ऑफ इंजीनियरिंग आणि सेंट विंसेंट पल्लोटी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग एंड टेक्नोलॉजी अशा ७ अभियांत्रिक महाविद्यालयातील १५० मुला, मुलींनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मेजर जनरल अनिल पी.



बाम, चंदू हलकंदर, अरविंद कुकड़े व विदर्भ वैभव संघाचे हेमंत चापले मंचावर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांना स्मृतीचिन्ह व वृक्ष देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी इंजिनिअरिंग इंडिया क्लबचे अमेय चौधरी यांनी उपस्थित पालकांना व विध्यार्थयांना इंजिनिअरिंग इंडिया क्लबने आता पर्यन्त अनेक समाजपयोगी व लोकहिताच्या केलेल्या कामाची विस्तृत माहिती आपल्या प्रास्ताविक भाषणातुन सांगितली.

कार्यक्रमाची सुरुवात सेंट विंसेंट पल्लोटी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग एंड टेक्नोलॉजीच्या विध्यार्थयां द्वारा 'ऐ वतन' गाण्यावर एक मनमोहक नृत्य प्रस्तुत करून केली.

श्री रामदेवबाबा विश्वविद्यालयच्या विध्यार्थयांद्वारा सैनिकांच्या जीवनावर आधारित नाटक सादर केले. यावेळी नाटका दरम्यान उपस्थितांच्या डोळ्यात पाणी होते, कमिंस कॉलेज ऑफ इंजीनियरिंग फॉर विमेनच्या मुलींनी बहादुर स्वतंत्रता सैनिकांवर एक कविता सत्र आयोजित केल्या गेले ज्यात झांसीची राणी, लक्ष्मीबाई आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कथा ऐकविल्या, प्रियदर्शिनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग विध्यार्थयांनी महिला सुरक्षा विषयावर एक नुक्कड़ नाटक प्रस्तुत केले,

जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग विध्यार्थ्यांनी नाम नही, एक जशन है भारत या देशभक्ति गाण्यावर नृत्य प्रस्तुत केले, यशवंतराव चौहान कॉलेज ऑफ इंजीनियरिंगच्या विध्यार्थ्यांन्नी गणतंत्र दिवस आणि भारतीय संविधानावर उत्साहजनक भाषण दिले 'कुटुम्ब प्रबोधन' नामक एक नाटक सादर केले, ज्यात पारिवारिक संबंधाचे महत्व काय असते हे सांगण्यात आले. इंजीनियरिंग इंडियाचे संस्थापक अरविंद कुकड़े, सेवानिवृत्त मेजर जनरल ए. पी. बाम आणि हेमंत चाफले यांचे भाषणे झाली.

## नव्वद तास..

उद्योजकांचा सल्ला
कामाचे नव्वद तास
इच्छा प्रबळ असता
कशाला होतो त्रास

सहज होईलं शक्य
मशीन मानं स्वतास
धारधार होई चातुर्य
बुध्दीला सतत तास

कमवायचे दिवस हे
काय मिळे अनायास
मोजू भरघोस छदाम
जितकेकराल प्रयास

जागेवर देणारंजेवण
ना म्हणू नये अन्नास
निवृत्ती नंतर खुशाल
खालं मोत्याचे घास

तेल गळते झराझरा
पहाजुंपला घाण्यांस
देवत्व मिळेपोळ्यास
प्रमाणमानावे बैलास

चैन काय करा पुन्हा
मुरड घालावी मनास
कमावून घ्यावे सध्या
शहाणे शिकवेजनास

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## विघ्नेश्वरा...!

प्रथमेश तू प्रथम वंदन
करितो तुजला गणराया...!
देई शक्ती अन बळ
आम्हां संकट निवाराया...!

तुझ्या आगमनाची बाप्पा
लहानथोरा लागतसे आस..!
अखंड चिंतन अन,
पूजनाची मनी असे ध्यास..!

लंब उदर तुझे लंबोदरा
दुःख आमुचे घेसी उदरी...!
सुखकारक विघ्नेश्वर तू
सदा सुख देसी पदरी...!

विराजमान होता समयी
जणू अंकुरती मनी पालवी...!
हृदयी विराजी बाप्पा तू
विसर्जनी नेत्र ओलवी..!

नामघोष तुझा आकांताने
करितो आम्ही गणराया
बहू रूपात उभा पाठीशी
सुख दयाया दुःख ताराया...!

**विनोद शेनफड जाधव**
**मु पो. मासरूळ**
**ता.जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

# क्षेत्र महाबळेश्वर येथे मातृगौरव दिन साजरा



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.३१, महाबळेश्वर :** ६ जानेवारी १६६५ साली सूर्य ग्रहणाचे औचित्य साधून संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ यांची सुवर्णतुला श्री क्षेत्रमहाबळेश्वर मंदिरात केली. याच ऐतिहासिक घटनेला तिथी नुसार येत्या २९ जानेवारी २०२५ पौष मौनी अमावस्या च्या दिवशी ३६० वर्ष पूर्ण होत आहेत तो क्षण तेथील शिवभक्त मातृगौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला.

या सुवर्ण क्षणी हजारो संख्येने शिवभक्त राजमाता जिजाऊ समोर नतमस्तक होण्यासाठी श्री क्षेत्र महाबळेश्वर येथे महाबळेश्वर मंदिरात उपस्थितीत राहून या सुवर्णक्षणाचे साक्षीदार झाले. सकाळी प्रथम महिला व ग्रामस्थ यांनी जिजाऊ यांच्या मुर्तीची पालखी मधुन मिरवणूक काढली नंतर महाबळेश्वर मंदिरामध्ये ज्या ठिकाणी महाराजांनी माँ साहेबाची सुवर्णतुला केली होती त्यांच ठिकाणी प्रतिकृती ची पुजा/ अभिषेक केला. सुवर्णतुला औचित्य साधुन जि.प.शाळे मध्ये मातृदिन म्हणुन मुलांनी आपल्या आई चे पुजन करून साजरा केला. कार्यक्रमाची सुरूवात प्रमुख मान्यवराच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आली शिव व्याख्याते नितिन बानगुडे पाटील यांचे व्याख्यान झाले नंतर गावातील मुलांनी नृत्य सादर केले. शाहीर चंद्रकांत माने यांचा पोवाड वाडा कार्यक्रम झाला त्या नंतर मान्यवरांचे नितीनकाका पाटील, राजुशेठ राजपुरे, प्रभाकर घार्गे, प्रदिप विधाते, बिडीओ यशवंत भांड, प्रविण भिलारे, पौर्णिमा बालन, मिलिंद एकबोटे, हेमंत सोनावणे यांचा सत्कार सरपंच सुनिल बिरामणे व ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आला. यावर्षीचा राजमाता जिजाऊ सन्मास रणरागिनी शाखा हिंदु जनजागृती समिती सातारा भक्तीताई दिपक डाफळे यांना प्रदान करण्यात आला. यानंतर मान्यवरांचे मार्गदर्शन झाले कार्यक्रमास महाबळेश्वर शहर, तालुकयासह सातारा, पुणे, सांगली जिल्हातुन शिवभक्त आले होते. तसेच गावातील महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तरूण वर्गाने खुप परिश्रम घेतले. सुत्रसंचलन प्रमोद पवार व गणेश शेडगे यांनी केले. आभार सरपंच सुनिल बिरामणे यांनी केले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## वुशूच्या ताईचीक्वॉन प्रकारात श्रावणी कटके हिला कांस्यपदक



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, उत्तराखंड :** पुण्याच्या श्रावणी कटके हिने येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमधील वुशूच्या ताईचीक्वॉन प्रकारात कांस्यपदक जिंकले. ताईचीक्वॉन हा वुशूचा एक महत्त्वपूर्ण प्रकार असून, त्यात शारीरिक संतुलन, लवचिकता आणि मानसिक एकाग्रतेची आवश्यकता असते.श्रावणीने यापूर्वीही विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तिच्या या यशामुळे महाराष्ट्रातील युवा खेळाडूंना प्रेरणा मिळेल आणि वुशू खेळात अधिक सहभाग वाढेल, अशी आशा श्रावणीने व्यक्त केली आहे.

श्रावणी कटके हिच्या या यशामुळे महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे. तिच्या कठोर परिश्रम, समर्पण आणि सातत्यपूर्ण सरावामुळे तिने हे यश संपादन केले आहे. तिच्या या कामगिरीबद्दल महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशनचे महासचिव नामदेव शिरगावकर व पथक प्रमुख संजय शेटे, खजिनदार धनंजय भोसले, ऑल महाराष्ट्र वुशू संघटनेचे अध्यक्ष एस एस झेंडे, सचिव सोपान कटके आणि प्रशिक्षक स्वयम् कटके, प्रतीक्षा शिंदे, गणेश यादव, दीपक माळी यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

## भागीरथी पंडित यांचे निधन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, कळवा (ठाणे) :** अक्षराज मिडियाचे वरिष्ठ पत्रकार तथा नाभिक समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते संजय पंडित यांच्या मातोश्री कै.भागीरथीबाई राजाराम पंडित यांचे सोमवार, दि.२७ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने तथा वृद्धापकाळाने कळव्यात निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९० वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा संजय पंडित, सून वंदना पंडित, अक्षय, साक्षी ही नातवंडे आणि मुलगी सुनीता कदम असा परिवार आहे. वारकरी सांप्रदयातील मातोश्री भागीरथी बाई यांचा दशक्रिया विधी बुधवार, दिनांक ०५ फेब्रुवारी २०२५ रोजी ठाण्यातील कळवा येथील मनीषा नगरच्या वैकुंठ भूमी येथे संपन्न होणार असल्याचे संजय पंडित यांनी कळविले आहे.

## विंग येथे रस्ता कॉंक्रिटिकरण योजनेचा शुभारंभ



**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.३०, विंग (सातारा) :** मौजे विंग ता. खंडाळा जि. सातारा येथील गुजर चौक येथे सातारा जिल्ह्याचे खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या प्रादेशिक पर्यटन विकास निधीतून १० लक्ष रुपयांच्या रस्ता कॉंक्रीटकरण योजनेचे उद्घाटन गुरवार दि. ३०/१/२०२५ रोजी माजी पंचायत समिती सदस्य चंद्रकांत यादव यांचे शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख उपस्थिती मा. पं. समिती सदस्य खंडाळा चंद्रकांत यादव, सातारा जिल्हा भाजपा नेते अनुप सूर्यवंशी तसेच पूनम तळेकर - ग्रा. पं.उपसरपंच विंग, नितीन महांगरे - ग्रा. पं.सदस्य विंग, योगेश मोकाशी - ग्रा. पं .सदस्य विंग, एल.आर.पडळकर ग्रामविकास अधिकारी साहेबराव महांगरे - चेअरमन राजेंद्र गुजर - सरपंच विंग, मच्छिंद्र महांगरे - मा.ग्रा.पं.सदस्य. धनंजय मानकर - सदस्य विंग विकास सेवा सोसायटी अरुण गुरुजी, प्रवीण महांगरे, सूर्यकांत पवार,अनिलभाई गुजर, बाबासाहेब शिरवले, श्रीरंग शेळके, तुषार तळेकर, अनिकेत खुटवड,अक्षय घाडगे, पंडित शेळके, संजय शिरवले, दत्तात्रय खुटवड, बाळासाहेब महांगरे नितीन तळेकर, प्रवीण तळेकर, विष्णू तळेकर, शंकर तळेकर, सुरेश तळेकर, शंकर चव्हाण, विजय तळेकर, विजय ना तळेकर, दशरथ तळेकर, मारुती जोशी, ज्योती खुटवड,विमल शेळके, कल्पना तळेकर,सुधा शेळके, शकुंतला शिरवले, मनीषा किन्हाळे, नंदा तळेकर, मंगल महांगरे, स्वाती लांडगे, हेमा तळेकर आदी मान्यवरांसाह ग्रामस्थ ग्रामपंचायत कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## महेश कुंभार यांची राष्ट्रीय योगासन तांत्रिक ऑफिशियल पदी निवड

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.३१, मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागात शारीरिक शिक्षण शिक्षक पदावर कार्यरत असलेल्या महेश कुंभार यांची राष्ट्रीय योगासन स्पर्धेच्या तांत्रिक ऑफिशियल म्हणून निवड झाली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागात शारीरिक शिक्षण शिक्षक पदावर कार्यरत असलेले महेश कुंभार हे कार्यकुशलतेमुळे व शांत, संयमी व योग्य निर्णय क्षमतेसाठी प्रसिद्ध आहेत. त्यांची उत्तराखंड राज्यातील अल्मोडा येथे संपन्न होणाऱ्या राष्ट्रीय खेळ २०२५ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय योग स्पर्धेच्या टेक्निकल ऑफिशियल पदी निवड करण्यात आल्याचे त्यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले. महेश कुंभार हे सध्या मुंबई सिटी योगासन स्पोर्ट्स असोसिएशनचे सचिव आहेत.त्यांची १४ ते १६ जानेवारी २०२५ दरम्यान कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील पारगाव येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय योगासन स्पर्धेसाठी तांत्रिक ऑफिशियल म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.महेश कुंभार हे पहिलेच महापालिकेचे शिक्षक आहेत की ज्यांची राष्ट्रीय योग स्पर्धेच्या टेक्निकल ऑफिशियल पदी वर्णी लागली आहे. महेश कुंभार हे यांनी आपल्या निवडीचे सर्वस्वी श्रेय बृहन्मुंबई महानगरपालिका व वरीष्ठ पर्यवेक्षक राजेश गाडगे पर्यवेक्षक दत्तू लवटे आणि गुरुवर्य सतीश मोहगावकर, डॉ.अरुण खोडस्कर तसेच महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष संजय मालपाणी यांना दिले आहे. कुंभार यांच्या निवडीबद्दल बृहन्मुंबई शारीरिक शिक्षण शिक्षक युनिट सह सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# धाराशिव शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी ४ एकरावर 'सारथी' भवन

## जागेचा प्रस्ताव शासनाला सादर करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.३१, धाराशिव :** लातूर विभागीय केंद्राच्या धर्तीवर धाराशिव शहरात ४ एकरावर सारथीचे भव्य सारथी भवन नियोजित आहे. यात प्रशिक्षण केंद्र, सुसज्ज प्रशासकीय इमारत, मुलं आणि मुलींसाठी प्रशस्त वसतीगृह, अत्याधुनिक अभ्यासिका यासह भव्य ऑडीटोरियमचा ही समावेश असणार आहे. आनंदनगर भागातील पशुसंवर्धन विभागाची जागा 'सारथी'कडे वर्ग करण्याबाबत शासनाला प्रस्ताव पाठवण्याची सूचना आपण जिल्हाधिकाऱ्यांना केली आहे. धाराशिव शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या पशुसंवर्धन विभागाच्या ११ एकर जागेची पाहणी केली. यातील पोल्ट्रीसाठी एकेकाळी वापरात असलेली परंतु आता वापरात नसलेली ४ एकर जागा लातूर येथील विभागीय केंद्राप्रमाणे भव्य आणि अद्ययावत सोयी सुविधांनी युक्त असे सारथी भवन साकारण्यासाठी तसेच मुलींच्या वसतिगृहासाठी सुरक्षित व योग्य असल्याचे लक्षात आल्याने निश्चित करण्यात आली आहे. मराठा समाजातील विद्यार्थी आणि युवा पिढीच्या सर्वांगीण प्रगतीसह, आर्थिक उन्नतीसाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे अर्थात सारथीची स्थापना करण्यात आली आहे. विविध पद्धतीने सारथीमार्फत मराठा समाजातील विद्यार्थ्यांसोबतच समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी व्यापक स्वरुपात उपक्रम आणि विविध योजना राबवण्यात येत आहेत. धाराशिव जिल्ह्यातील मराठा समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थी आणि युवकांना त्याचा लाभ मिळावा यासाठी हे केंद्र उभारण्यास आपल्या महायुती सरकारने अनुमती दिली आहे.

लातूर विभागीय केंद्राच्या धर्तीवर अगदी त्याच पद्धतीने आपल्या धाराशिव शहरात अद्ययावत आशा सर्व बाबींचा अंतर्भाव असलेले सुसज्ज असे सारथी भवन उभारण्यात येणार आहे. त्यासाठी सुरुवातीला १ एकर जागा घेण्याबाबत चर्चा चालू होती. मात्र सारथीचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांच्या सोबत झालेले चर्चेच्या अनुषंगाने धाराशिव येथे सारथी भवन उभारण्यासाठी ४ एकर जागा आवश्यक असल्याने आनंदनगर येथे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या पशुसंवर्धन विभागाच्या ४ एकर जागेची पाहणी केली. मराठा समाज बांधवांसाठी महायुती सरकारने घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णयानुसार एक सुसज्ज सारथी भवन उभारण्यासाठी



ही जागा सर्वार्थाने अनुकूल असून जिल्ह्यातील मराठा विद्यार्थी आणि युवकांसाठी अगदी मध्यवर्ती भागात असलेली ही जागा अत्यंत सोयीची असल्याने लवकरच जागा सारथीला मिळावी यासाठी प्रक्रिया राबविण्यात येईल. यावेळी तहसीलदार मृणाल जाधव, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.यतीराज पुजारी, उपअभियंता मोरे, मराठा समाजाचे युवक कार्यकर्ते, सुनील काकडे, अमित शिंदे, राजसिंहा राजेनिंबाळकर, अभय इंगळे, अक्षय ढोबळे, अमोल राजेनिंबाळकर, संदीप इंगळे, खंडू राऊत, रमण जाधव आदी उपस्थित होते.

जागेचा प्रस्ताव दाखल करण्याची जिल्हाधिकाऱ्यांना सूचना धाराशिव शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी पशुसंवर्धन विभागाची जागा आहे. सुसज्ज आणि भव्य आशा विभागीय सारथी भवनसाठी आवश्यक असलेली सलग ४ एकर जागा याठिकाणी उपलब्ध आहे. ती जागा सारथीला देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे तातडीने पाठवावा असे निर्देश त्यांना दिले आहेत. यासाठी रु.१५० कोटी खर्च अपेक्षित आहे. या कामासाठी जवळपास ४ लाख वर्गफुट जागा लागणार असून सदर काम टप्पे पाडून करण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर झाल्यावर आपण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन खात्याचे मंत्री अजितदादा पवार यांच्याकडे पाठपुरावा करून धाराशिव जिल्ह्यातील मराठा समाजातील विद्यार्थी आणि युवकांच्या भविष्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेला हा विषय तातडीने मार्गी लावणार आहोत.

# महाराष्ट्राला रुग्बीमध्ये 1 रौप्य, 1 कांस्य;पुरुष संघाला रौप्य, महिलांना कांस्य





**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, उत्तराखंड :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत रुग्बी सेव्हनमध्ये ही महाराष्ट्राने खाते उघडून १ रौप्य व १ कांस्य पदकांची कमाई केली. अंतिम लढतीत दिल्लीकडून पराभूत झाल्याने पुरुष संघाला रौप्यपदक वर समाधान मानावे लागले तर महिला संघाने दिल्लीला नमवून कांस्यपदक खेचून आणले.

महाराणा प्रताप क्रीडा संकुलात संपलेल्या रुग्बी सेव्हन स्पर्धेत महाराष्ट्राने प्रथमच दुहेरी पदकाची करिश्मा घडविला. पुरूषांच्या अंतिम सामन्यात बलाढ्य हरियाणाने महाराष्टाला २२-७ गुणांनी पराभूत केले. ओरिसा व दिल्ली संघाना नमवून अंतिम फेरीत धडक मारणार्या महाराष्ट्र संघाला अंतिम फेरीत सूर गवसला नाही. प्रशांत सिंग व तेजस पाटीलने आक्रमण करून ७ गुणांची कमाई केली. सांघिक खेळाच्या जोरावर हरियाणाने सुवर्णपदक जिंकले. गत गोवा स्पर्धेत महाराष्ट्राला कांस्य पदक मिळाले होते.

महिलांच्या कांस्य पदकाच्या लढतीत महाराष्ट्राने दिल्लीवर १७ - १० गुणांनी दणदणीत विजय संपादन केला. उपांत्य लढतीत ओरिसाकडून ५ - ३१ गुणांनी पराभूत झाल्यानंतर मनाधैर्य खेचून न जाता महाराष्ट्राच्या मुलींनी आक्रमक खेळाचे प्रदर्शन घडवले. अनुभवी कल्याणी पाटील, आकांक्षा काटकारे व सारा खान यांनी सुरूवातीपासून आघाडी देत कांस्यपदकावर महाराष्ट्र राज्याचे नाव कोरले. या संघाने गत स्पर्धेत चौथे स्थान प्राप्त झाले होते.

## डोळस होऊन नैतिकतेने समृद्ध व्हा- डॉ.वैशाली विरकर

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.३१, खंडाळा (सातारा) :** सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय येथे विद्यार्थी विकास मंडळ आयोजित अभ्यासाला नैतिकतेची जोड या विषयावर ३१ जानेवारी २०२५ रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यासाठी साधनव्यक्ती म्हणून जीवन विद्या मिशन, वाई साधक डॉ.वैशाली विरकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना डॉ विरकर म्हणाल्या-माणूस विचारी असतो विद्यार्थी दशेत त्याचा सर्वांगीण विकास होण्याची प्रक्रिया सुरू असते,वर्तमानातला विद्यार्थी तंत्रज्ञान आभासी आयुधांशी संलग्न आहे, क्षणाक्षणाची माहिती तो किंवा ती एकमेकांना वाटत आहे.यातून काय साध्य होतेय याबद्दल अनभिज्ञता आहे.परंतु, वास्तव जीवन शिक्षणातील नीतिमूल्ये माणूस जाणण्यासाठी त्याला मनाचे डोळे उघडे ठेवण्याची म्हणजे डोळस व्हायची गरज आहे. भावनाप्रिय माणूस सुखाच्या शोधात वेडा होतो म्हणजे बेभान होतो. विचार अदृश्य आहेत ते पाहण्यासाठी आपली नीतिमत्ता आणि कृती शुद्ध असणे गरजेचे आहेत.



मानसिकता बदलण्यासाठी स्वतःपासून सुरुवात करण्याची आवश्यकता आहे. चांगल्या-वाईटची जाणीव समजून घेण्यासाठी वामनराव पै. यांच्या जीवन मिशनचे संस्कार कार्य समजून घ्यावे लागेल यामध्ये विश्वशांती प्रार्थना-हे ईश्वरा सर्वांना चांगली बुद्धी दे आरोग्य दे, सर्वांचं चांगलं कर... यातून मनाचा शोध घेऊन स्व सोबत दुसऱ्याचे जीवन चांगले नीतिमान होईल एवढं नक्की आहे प्रास्ताविक व स्वागत करताना इतिहास विभाग प्रा. रोहिणी मोरे म्हणाल्या-आजचा विद्यार्थी नीतिमत्तेतून सुखी होण्यासाठी दुसऱ्यावर विसंबून राहतो याऐवजी त्याने स्वतःला ओळखून 'स्व' चा शोध घेऊन चांगला माणूस व्हावं.

अध्यक्षीय मनोगतात डॉ.प्रतिभा पाटणे म्हणाल्या-जो दुसऱ्यावरी विसंबला,त्याचा कार्यभाग बुडाला या पंक्तीप्रमाणे वर्तमानात मनाच्या शोधाची गरज आहे. मोबाईल मग्न तरुणाईला नीतिमत्ता प्रबोधनातून सजग करण्यासाठी जीवन विद्या साधनेच्या प्रशिक्षणात सहभागी व्हा असे आवाहन केले.

यावेळी जीवन विद्या मिशन पदाधिकारी व साधक सतीश जेधे, सतीश पानसे, सुनिता पानसे, स्वाती मांढरे, उत्तमराव भोसले, संदीप केंजळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा.प्रतिक्षा माने यांनी सूत्रसंचालन, प्रा.अस्मिता येवले यांनी आभार मानले. विद्यार्थी विकास मंडळ प्रमुख प्रा.सुचिता मोरे यांनी स्वागत केले. प्रा.प्राची गायकवाड, प्रा.अनिकेत गायकवाड, प्रा.काजल पाटील,प्रा. नयना ओंबळे यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यशाळेसाठी सर्व विभाग विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

## विध्यार्थी गुणगौरव सोहळा २०२५

**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.३१, सोनारपाडा :** वन लाईफ फॉउंडेशन ट्रस्ट, महाराष्ट्र राज्य तर्फे मुरबाड शहापूर एकात्मिक संघटना, डोंबिवली सोनारपाडा येथे विध्यार्थी गुणगौरव सोहळ्यामध्ये किसनजी बोन्द्रे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय वह्या वाटप कार्यक्रम करण्यात आला. संघटनेचे पाचवे वार्षिक स्नेहसम्मेलन नुकतेच आई माता मंदिर, सोनारपाडा डोंबिवली पूर्व येथे संपन्न झाला. पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले तसेच दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विध्यार्थी गुणगौरव कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुरबाड - शहापूर एकात्मिक संघटना, डोंबिवली अध्यक्ष नितीन हरड, सचिव राजाराम पठारे, खजिनदार संतोष अधिकारी तसेच या कार्यक्रमप्रसंगी प्रमुख अतिथी मुकेश पाटील (सरपंच सोनारपाडा, डोंबिवली) प्रमिला पाटील (नगरसेविका के.डी. एम.सी) मोनिका पालवे (जिजाऊ संस्था, समाजसेविका महिला सक्षमीकरण महाराष्ट्र राज्य), किसन बोन्द्रे (जेष्ठ समाजसेवक तसेच प्रमुख सल्लागार वन लाईफ फॉउंडेशन ट्रस्ट), शशिकांत चौधरी (सेवानिवृत्त सार्वजनिक उपअभियंता, मुंबई) किरणजी सोकांडे (अध्यक्ष- कुणबी महोत्सव शहापूर), संजय लोणे (अध्यक्ष - वन लाईफ फॉउंडेशन ट्रस्ट), रामचंद्र देसले समाजसेवक व उद्योजक. आदी मान्यवर उपस्थित होते.

